आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत् सन २०१७-१८ करीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या केंद्रिय योजनांतर्गत तरतूदींचे वितरण - भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती. (२२२५ २२८२) (दुसरा हफ्ता)

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८ / प्र. क्र. ०३ /कार्यासन.०६.**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख: - २३-०३-२०१८.

**वाचा -**

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
३) आविवि, शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१७ / प्र. क्र.०३ / का.०६, दि. २०-६-२०१७ व दि.०५/०१/२०१८
४) जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकारचे पत्र क्र. २००१४ /०१/ २०१७-स्कॉलरशिप दि.२०/०३/२०१८.
५) आदिवासी विकास विभागाची नस्ती क्र. शिष्यवृ-२०१७ /प्र.क्र.७४/कार्या-१२.

**शासन निर्णय-**

आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता मागणी क्र. टी-५, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण अंतर्गत केंद्र पुरस्कृत योजना (०२) (०९) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (२२२५ २२८२), ३४- शिष्यवृत्ती व विद्यावेतने करिता एकूण रु.२५०००.०० लक्ष तरतूद अर्थसंकल्पित आहे. केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये सदर योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये वितरीत केला आहे. आता केंद्र शासनाने या योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता दुसऱ्या हफ्त्याकरीता त्यांच्या वाचा क्र.३ येथील दि.२०/०३/२०१८ रोजीच्या आदेशान्वये रु.१९३३.०० लाख इतका निधी वितरीत केला आहे. त्यानुसार सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. केंद्र पुरस्कृत भारत सरकार मेट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याचे वित्त विभागाने प्रमाणित केले आहे. सबब, (०२) (०९) भारत सरकार मॅट्रिकोत्त्तर शिष्यवृत्ती (लेखाशिर्ष २२२५ २२८२), ३४- शिष्यवृत्ती व विद्यावेतने याखाली रु.१९३३.०० लक्ष ( रु. एकोणीस कोटी तेहत्तीस लाख फक्त) इतकी तरतूद नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक

यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर तरतूद सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील प्रलंबित मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी वापरण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ अनौ. १३८/अर्थोपाय,दि. २२/०३/२०१८ नुसार प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.mahara/shtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक 201803261125498124 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.26 11:52:23 +05'30'

**रविंद्र दि. औटे**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
२. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती
३. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
४. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र राज्य विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. वित्त विभाग (अर्थसंकल्प-१९/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

९. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०.अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, का-१२

११. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.